# जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे

दिनांक: २४/०९/२०२४.

## निविदा सुचना

जिल्हा न्यायालय, ठाणे येथील मुख्य मशीनवर ७५ टेलिफोन युनिटचे अंतर्गत दुरध्वनी यंत्रणा कार्यरत असून मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे यांचे शासकीय निवासस्थान येथील मुख्य मशीनवर ०३ टेलिफोन युनिटची अंतर्गत दुरध्वनी यंत्रणा कार्यरत आहेत. सदर अंतर्गत दुरध्वनीबाबत सर्व खर्च समाविष्ट असलेला दुरुस्ती, देखभाल व सेवाहमीचा वार्षिक करार करणेसाठी कार्यालयीन अटी व शर्तीनुसार सेवा पुरविण्यास इच्छुक असलेल्या तसेच शासकीय आस्थापनांना सेवा पुरविण्याचा अनुभव असलेल्या स्थानिक सेवा पुरवठादारांकडुन बंद स्वरुपात निविदा/दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

तरी इच्छुक व्यक्ती/संस्थांनी दिनांक ०३/१०/२०२४ सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे यांचे नावे निम्नलिखित पत्त्यावर बंद लखोटयात निविदा सादर कराव्यात.

पत्ता :- जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे,<br>कोर्टनाका, ठाणे प. ४००६०१.

तसेच निविदा/दरपत्रक स्विकृत करण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार सर्वस्वी मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे यांचा राहील. अधिक माहितीकरीता व अटीशर्ती जाणुन घेण्याकरिता कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

DISTRICT COURT जिल्हा न्यायालय ठाणे THANE

हुकूमावरुन,

प्रबंधक,<br>जिल्हा व सत्र न्यायालय,<br>ठाणे.

ठाणे.<br>दिनांक : २४/०९/२०२४.

# अंतर्गत दुरध्वनीबाबत अटी व शर्ती

१.) जिल्हा न्यायालय, ठाणे व मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे यांचे शासकीय निवासस्थान, 'प्रज्ञा' बंगला, कोपरी, ठाणे (पुर्व) येथील अंतर्गत दुरध्वनी यंत्रणेबाबत करण्यात येणारा करार हा एक वर्षासाठीच असेल.

२.) जिल्हा न्यायालय, ठाणे व मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे यांचे शासकीय निवासस्थान, 'प्रज्ञा' बंगला, कोपरी, ठाणे (पुर्व) येथील अंतर्गत दुरध्वनी यंत्रणा ही चालु स्थितीत आहे हि बाब मान्य करुन सेवा पुरवठादाराने निविदा देणे आवश्यक आहे.

३.) जिल्हा न्यायालय, ठाणे येथील मुख्य मशीनवर ७५ टेलिफोन युनिटचे अंतर्गत दुरध्वनी यंत्रणा व मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे यांचे शासकीय निवासस्थान, 'प्रज्ञा' बंगला, कोपरी, ठाणे (पुर्व) येथील येथील मुख्य मशीनवर ०३ टेलिफोन युनिटचे अंतर्गत दुरध्वनी यंत्रणेकरीता निविदा देणेपुर्वी सेवा पुरवठादाराने सदर दुरध्वनी यंत्रणा तपासुन पहावी तद्नंतर सदरबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

४.) जिल्हा न्यायालय, ठाणे व मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे यांचे शासकीय निवासस्थान, 'प्रज्ञा' बंगला, कोपरी, ठाणे (पुर्व) येथील अंतर्गत दुरध्वनी यंत्रणेकरीता सेवा पुरवठादाराबरोबर करण्यात येणारा वार्षिक करार हा सर्व खर्च समाविष्ट असा करार राहील. यामध्ये सेवा पुरवठादारावर पुढील जबाबदारी राहील.

१. अंतर्गत दुरध्वनी यंत्रणा सुरळीत चालु राहील याची खबरदारी घ्यावी.

२. अंतर्गत दुरध्वनी यंत्रणेमध्ये काही मोठा बिघाड झाल्यास त्याच्या खर्चाची जबाबदारी ही सेवा पुरवठादाराची राहील.

३. अंतर्गत दुरध्वनी यंत्रणेच्या मुख्य मशीनला एक अतिरिक्त मशीनची व्यवस्था करावी जेणेकरुन मोठा बिघाड होवुन यंत्रणा बंद पडल्यास अतिरिक्त मशीनवर यंत्रणा कार्यरत राहील.

४. वायरिंगचा खर्च सेवा पुरवठादारास करावा लागेल.

५. टेलिफोन युनिट आवश्यक तेथे पुरवावे लागतील व त्याचा खर्च पुरवठादारास करावा लागेल.

६. नविन न्यायालयांना/कार्यालयांना अंतर्गत दुरध्वनी यंत्रणेचा पुरवठा करणेची जबाबदारी सेवा पुरवठादाराची राहील व त्याबाबतचा खर्च सेवा पुरवठादारास करावा लागेल.

७. अंतर्गत दुरध्वनी यंत्रणेची मुख्य मशीन काही कारणास्तव किंवा आकस्मित परिस्थीती उध्दभवल्यास इतरत्र हालविण्याची गरज किंवा आवश्यकता भासल्यास वायरिंगचा व इतर खर्च सेवा पुरवठादारास करावा लागेल. अंतर्गत दुरध्वनी यंत्रणा पुर्ववत सुरळीत चालु राहील याची खबरदारी व दक्षता पुरवठादास घ्यावी लागेल.

५.) अंतर्गत दुरध्वनी यंत्रणा सुरळीत कार्यरत राहील या साठी सेवा पुरवठादारा एक अधिकृत व्यक्ती जिल्हा न्यायालयात हजर ठेवील.

६.) अंतर्गत दुरध्वनी यंत्रणेबाबत सेवा पुरविल्याबद्दल देय असलेले बील कार्यालयाकडुन नियमानुसार दिले जाईल.

७.) सेवा पुरवठादाराने इतर शासकीय कार्यालयांना सेवा पुरविल्याबाबतचे मागिल ३ वर्षाचे प्रमाणपत्र निविदेसोबत जोडणे आवश्यक राहील.

८.) इमारतीमध्ये स्थलांतरीत होणा-या न्यायालयांना / कार्यालयांना अंतर्गत दुरध्वनी देणे आवश्यक राहील.

९.) सेवा पुरवठादारा यांनी उपरोक्त अटी व शर्तीचे उल्लंघन केल्यास कोणतीही नोटीस न देता करार रद्द करण्याचा अधिकार व नुकसान भरपाईची रक्कम सेवा पुरवठादारा यांच्याकडून वसुल करण्याचे अधिकार मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, ठाणे यांचेकडे राहतील.

१०.) निविदाकाराने निविदेसोबत आवश्यक ती कागदपत्रे (पॅनकार्ड, लायसन्स, अनुभव दाखला) जोडणे आवश्यक आहे.

अशाप्रकारे जिल्हा न्यायालय, ठाणे व परिसरातील त्यांचे अधिपत्याखालील अंतर्गत दुरध्वनी यंत्रणा सुरळीत व व्यवस्थीत चालु राहील याची जबाबदारी संबंधीत सेवा पुरवठादाराची राहील.

DISTRICT COURT जिल्हा न्यायालय THANE

हुकूमावरुन,

प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय,
ठाणे.

ठाणे.
दिनांक : २४/०९/२०२४.